

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व,
मुंबई – ४०००५१. ☎ ०२२-६६४०५०६६/७७.
ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा
MHADA

==========================================================================

जावक क्रमांक –८३२/१०८ दिनांक :- २८ ऑगस्ट, २०२५

## प्रसिद्धिपत्रक

म्हाडा कोकण मंडळ सोडत - २०२५

**५,२८५ सदनिका आणि ७७ भूखंड विक्रीसाठी आयोजित सोडतीकरिता ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी १२ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ**

९ ऑक्टोबर २०२५ रोजी ठाणे येथील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह येथे संगणकीय सोडत

मुंबई, दि. २८ ऑगस्ट, २०२५ : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा (म्हाडा) विभागीय घटक कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे ठाणे शहर व जिल्हा, वसई (जि. पालघर) येथील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या ५,२८५ सदनिका व ओरोस (जि. सिंधुदुर्ग), कुळगाव-बदलापूर येथील ७७ भूखंड विक्रीकरिता आयोजित सोडतीसाठी अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेला दि. १२ सप्टेंबर २०२५ पर्यंत दुसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली आहे. अनामत रकमेसह प्राप्त पात्र अर्जांची सोडत आता दि. ०९ ऑक्टोबर २०२५ रोजी ठाणे येथील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह येथे काढण्यात येणार आहे, अशी माहिती मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर यांनी दिली.

सदर सोडतीसाठी दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत १,४९,९४८ अर्ज प्राप्त झाले असून अनामत रकमेसह १,१६,५८३ अर्ज प्राप्त झाले आहेत. नवीन वेळापत्रकानुसार सदर सोडतीसाठी दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत आहे. दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्जदार अनामत रकमेचा भरणा ऑनलाईन करता येणार आहे. दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रात्री ११.५९ वाजेपर्यंत आरटीजीएस/एनईएफटीद्वारे अर्जदारांना बँकेत अनामत रकमेचा भरणा करता येणार आहे.

सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे अर्जदार या प्रणालीद्वारे पात्र ठरविले जातील. सोडतीसाठी स्वीकृत अर्जांची प्रारूप यादी दि. २२ सप्टेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता 'म्हाडा'च्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. दिनांक २४ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ०६ .०० वाजेपर्यंत अर्जदारांना प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यापासून ऑनलाईन दावे व हरकती नोंदविता येणार आहेत. सोडतीसाठी पात्र ठरलेल्या अर्जदारांची अंतिम यादी दिनांक ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता 'म्हाडा'च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. दिनांक ०९ ऑक्टोबर २०२५ रोजी सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या व प्रतीक्षा यादीवरील अर्जदारांची नावे म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

कोकण मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेली ही सोडत पाच घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत एकूण ५६५ सदनिका, १५ टक्के एकात्मिक शहर गृहनिर्माण योजनेअंतर्गत ३००२ सदनिका, म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजना व विखुरलेल्या सदनिका आहे त्या स्थितीमध्ये या योजनेअंतर्गत १६७७ सदनिका, म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजनेअंतर्गत (५० टक्के परवडणाऱ्या सदनिका) ४१ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तसेच म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजनेअंतर्गत ७७ भूखंड विक्रीसाठी उपलब्ध आहेत. दि. १५ जुलै २०२५ रोजी 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ करण्यात आला. मंडळातर्फे पहिल्यांदा दि. २८ ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज करण्यास अर्जदारांना मुदतवाढ देण्यात आली होती. सोडतीसंदर्भात अर्ज भरतांना अर्जदारांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी मंडळातर्फे ०२२ - ६९४६८१०० हा हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. सोडतीसाठी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरूनच अर्जदारांनी अर्ज करावा, असे आवाहन कोकण मंडळातर्फे करण्यात आले आहे.

###

स्वाक्षरीत/-
(वैशाली गडपाले)
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

X @mhadaofficial  f @mhadaofficial  Instagram @mhadaofficial  YouTube @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. ☎ 022-55405066/77.
Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================

Outward No. : 832/108 Dt. 28th August, 2025

**Press Release**

MHADA Konkan Board Lottery 2025

**Deadline for submitting online application for the sale of 5,285 tenements and 77 plots has been extended till 12th September**

Computerised lottery draw will be held on 9 October 2025 at Dr. Kashinath Ghanekar Natyagriha in Thane

Mumbai, August 28, 2025 – The Konkan Housing and Area Development Board, a regional unit of the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA), has extended the deadline for submitting online applications for its 2025 housing lottery. A total of 5,285 flats and 77 residential plots are available for sale under various housing schemes in Thane city and district, and Vasai (Palghar district). Applicants can now apply online until 12th September 2025.

The computerised lottery draw will be conducted on 9th October 2025 at Dr. Kashinath Ghanekar Auditorium, Thane, as announced by Mrs. Revati Gaikar, Chief Officer of the Konkan Board. As of 4:00 PM on 28th August 2025, MHADA had received a total of 1,49,948 applications, out of which 1,16,583 applications included the required earnest money deposit. As per the revised schedule, the last date for online application submission is 12th September 2025, till 11:59 PM. The earnest money deposit can be paid online until 13th September 2025, 11:59 PM. Alternatively, applicants can also pay via RTGS/NEFT through banks until 15th September 2025, 11:59 PM.

Only applicants who complete all required documents and make the payment will be considered eligible for the lottery. A draft list of eligible applicants will be published on 22nd September 2025 at 6:00 PM on MHADA's official website https://housing.mhada.gov.in. Applicants will have the opportunity to submit online claims and objections until 24th September 2025, 6:00 PM. The final list of eligible applicants will be published on 7th October 2025 at 6:00 PM, and the names of successful and waitlisted applicants will be available on the website on the day of the lottery, 9th October 2025.

The flats and plots in this lottery are divided into five categories. Under the 20% Inclusive Housing Scheme, 565 flats are available; under the 15% Integrated Urban Housing Scheme, 3,002 flats are offered. The MHADA Konkan Housing Scheme also includes 1,677 existing scattered flats and 41 flats under the Affordable Housing (50% reserved) category. In addition, 77 plots located in Oros (Sindhudurg) and Kulgaon-Badlapur are also available for sale. The online application process began on 15th July 2025, inaugurated by MHADA's Vice President and CEO, Mr. Sanjeev Jaiswal (IAS). The application deadline was previously extended to 28th August 2025 and has now been extended again until 12th September to allow more people to participate. For any queries or assistance during the application process, applicants can contact the helpline at 022-69468100. The Konkan Board urges all applicants to use only MHADA's official website – https://housing.mhada.gov.in for submitting applications and accessing lottery-related information.

###

Sd/-

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer / MHADA

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. ☎ 022-55405066/77.
Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================

Outward No. : 832/108 Dt. 28th August, 2025

**Press Release**

म्हाडा कोंकण मंडल लॉटरी – 2025

**5,285 मकान और 77 भूखंडों की बिक्री हेतु आयोजित लॉटरी के लिए ऑनलाइन आवेदन करने की अंतिम तिथि 12 सितम्बर तक बढ़ाई गई।**

09 अक्टूबर 2025 को ठाणे स्थित डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह में कम्प्यूटर आधारित लॉटरी।

मुंबई, दिनांक 28 अगस्त, 2025 : महाराष्ट्र गृहनिर्माण एवं क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) के विभागीय घटक कोंकण गृहनिर्माण एवं क्षेत्र विकास मंडल की ओर से ठाणे शहर व जिला, वसई (जिला पालघर) स्थित विभिन्न गृहनिर्माण योजनाओं के अंतर्गत निर्मित 5,285 मकान तथा ओरोस (जिला सिंधुदुर्ग), कुलगांव-बदलापुर स्थित 77 भूखंडों की बिक्री हेतु आयोजित लॉटरी के लिए आवेदन पंजीकरण एवं भुगतान प्रक्रिया की अंतिम तिथि 12 सितम्बर 2025 तक दूसरी बार बढ़ाई गई है। पात्र आवेदनों की लॉटरी अब 09 अक्टूबर 2025 को ठाणे के डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह में निकाली जाएगी, ऐसी जानकारी कोंकण मंडल की मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर इन्होने दी.

इस लॉटरी के लिए 28 अगस्त 2025 को शाम 4.00 बजे तक कुल 1,49,948 आवेदन प्राप्त हुए हैं, जिनमें से 1,16,583 आवेदन अनामत राशि सहित प्राप्त हुए हैं। नए कार्यक्रमानुसार लॉटरी हेतु ऑनलाइन आवेदन करने की अंतिम तिथि 12 सितम्बर 2025 रात 11.59 बजे तक है। 13 सितम्बर 2025 रात 11.59 बजे तक आवेदक ऑनलाइन अनामत राशि का भुगतान कर सकेंगे। वहीं, 15 सितम्बर 2025 रात 11.59 बजे तक आवेदक बैंक में RTGS/NEFT के माध्यम से अनामत राशि जमा करा सकेंगे।

सभी आवश्यक दस्तावेज पूरे करने वाले आवेदक इस प्रणाली के माध्यम से पात्र माने जाएंगे। लॉटरी के लिए स्वीकृत आवेदनों की प्रारूप सूची 22 सितम्बर 2025 को शाम 6.00 बजे म्हाडा की आधिकारिक वेबसाइट https://housing.mhada.gov.in पर प्रकाशित की जाएगी। 24 सितम्बर 2025 को शाम 6.00 बजे तक आवेदक इस प्रारूप सूची पर ऑनलाइन आपत्ति व दावे दर्ज कर सकेंगे। पात्र आवेदकों की अंतिम सूची 07 अक्टूबर 2025 को शाम 6.00 बजे म्हाडा की वेबसाइट पर प्रकाशित की जाएगी। 09 अक्टूबर 2025 को लॉटरी में सफल तथा प्रतीक्षा सूची में शामिल आवेदकों के नाम भी म्हाडा की वेबसाइट पर प्रकाशित किए जाएंगे।

कोंकण मंडल की इस लॉटरी को पांच घटकों में विभाजित किया गया है। इनमें 20 प्रतिशत समावेशी योजना के अंतर्गत 565 मकान, 15 प्रतिशत एकात्मिक शहर गृहनिर्माण योजना के अंतर्गत 3002 मकान, म्हाडा कोंकण मंडल गृहनिर्माण योजना एवं अन्य स्थित मकान योजना के अंतर्गत 1677 मकान, म्हाडा कोंकण मंडल गृहनिर्माण योजना (50 प्रतिशत किफायती मकान) के अंतर्गत 41 मकान तथा म्हाडा कोंकण मंडल गृहनिर्माण योजना के अंतर्गत 77 भूखंड बिक्री के लिए उपलब्ध हैं। 15 जुलाई 2025 को म्हाडा के उपाध्यक्ष एवं मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयसवाल (भा.प्र.से.) के हाथों से इस लॉटरी हेतु ऑनलाइन आवेदन प्रक्रिया का शुभारंभ किया गया था। मंडल की ओर से आवेदकों को पहली बार 28 अगस्त 2025 तक आवेदन करने की तिथि बढ़ाई गई थी। लॉटरी आवेदन भरते समय आवेदकों को आने वाली कठिनाइयों के समाधान हेतु मंडल की ओर से हेल्पलाइन नंबर 022 - 69468100 उपलब्ध कराया गया है। इस लॉटरी के लिए आवेदकों को केवल म्हाडा की आधिकारिक वेबसाइट https://housing.mhada.gov.in के माध्यम से ही आवेदन करना होगा, ऐसा आवाहन कोंकण मंडल की ओर से किया गया है।

###

Sd/-
(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer / MHADA

----------------------------------------------------------

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial